लोकमत

# रक्ताच्या कर्करोगावरील आयुर्वेदिक औषध निर्मिती

## वनस्पती शास्त्रज्ञांचे संशोधन

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील वनस्पती शास्त्रज्ञांच्या चमूने रक्ताच्या कर्करोगावरील उपचारासाठी आयुर्वेदिक औषध निर्मिती केली आहे. त्याला ऑस्ट्रेलियन सरकारकडून औषधनिर्मिती पेटंट मंजूर झाले आहे.

विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. डी. के. गायकवाड आणि त्यांचे संशोधक विद्यार्थी डॉ. चिराग नारायणकर, निवास देसाई, मानसी पाटील (संत गाडगे महाराज कॉलेज कऱ्हाड), सागर देशमुख (न्यू कॉलेज, कोल्हापूर), प्रतिष्ठा पवार (दा. पा. कॉलेज, कर्जत) आणि उमेश पवार (पं. खे. कॉलेज, सावंतवाडी) यांना ऑस्ट्रेलिया सरकारकडून 'सिंथेसिस ऑफ ब्लड कॅन्सर सेल ग्रोथ इनहीबिटर' या विषयावरील औषध निर्मितीमध्ये पेटंट मंजूर झाले आहे. रक्ताचा कर्करोग घातक आजार असून, यामुळे जगभरात लाखो लोक मृत्युमुखी पडतात. या भीषण रोगाला प्रतिरोध करणाऱ्या औषध निर्मितीसाठी जगभरातील संशोधक प्रयत्न करत आहेत. या संशोधनाचा एक भाग म्हणून डॉ. गायकवाड आणि त्यांच्या संशोधक विद्यार्थ्यांनी रक्ताच्या कर्करोगावरील आयुर्वेदिक औषधाची निर्मिती केली आहे. या वनस्पती शास्त्रज्ञांच्या संपूर्ण चमूला स्तनाच्या कर्करोगावरील उपचारासाठी केंद्र सरकारकडून दोन पेटंट मंजूर झाले आहेत. या चमूने कर्करोगावरील संशोधनासाठी अमेरिकेकडेही पेटंटसाठी प्रस्ताव पाठवला आहे. त्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.



निवास देसाई



चिराग नारायणकर



### आयुर्वेदिक औषध असे

या आयुर्वेदिक औषधामध्ये निवडुंग प्रजातीच्या वनस्पतीचा अर्क वापरला आहे. या औषधातील जीवाणूरोधक गुणधर्मामुळे रक्ताच्या कर्करोगाच्या पेशींची मात्रा कमी करण्यासाठी ते प्रभावी ठरू शकते. औषधाच्या मदतीने रक्ताच्या कर्करोगाच्या उपचारावर चांगला पर्याय देण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत, असे डॉ. डी. के. गायकवाड यांनी सांगितले.

लोकमत

# संभाजीराव मोहिते यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनातर्फे आज (गुरूवारी) सायंकाळी सहा वाजता दसरा चौकातील राजर्षी शाहू सभागृहाच्या मिनी हॉलमध्ये ॲड. संभाजीराव मोहिते यांचे व्याख्यान होणार आहे. 'बाळासाहेब देसाई : काल, आज आणि उद्या' असा व्याख्यानाचा विषय आहे. देसाई यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचे उद्या 'बजेट'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची अधिसभा (सिनेट) शुक्रवारी दुपारी १२ वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहामध्ये होणार आहे. त्यात सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामधील सुमारे पाचशे कोटींच्या अंदाजपत्रकाचे (बजेट) सादरीकरण होणार आहे. अधिसभा सदस्यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ ऑगस्टमध्ये संपणार आहे. त्यामुळे त्यांची बजेटबाबत ही अखेरची सभा असणार आहे.

गेल्यावर्षी अधिसभेने ५१० कोटी २२ लाख रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर केले होते. हे अंदाजपत्रक आठ कोटी ८२ लाख रुपये इतक्या तुटीचे होते. ही तूट विद्यापीठाने निधीतील शिलकीतून भरून काढली होती. मेरिट स्कॉलरशिप, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सोयी-सुविधा, एक नवीन वसतिगृह आणि चार नव्या इमारतींची उभारणी, विविध पाच वसतिगृहांची दुरुस्ती, ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रम, इनडोअर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आदी विद्यार्थी सुविधा आणि रिसर्च स्किमद्वारे संशोधनासाठी निधीची तरतूद गेल्यावर्षी करण्यात आली होती.

अधिसभेतील प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर बजेट सादरीकरण होईल. त्याबाबतच्या काही विषयांसह कुलसचिव, नियमित अधिष्ठाता पदभरती, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये नेट-सेट अथवा पीएच.डी. नसताना शारीरिक शिक्षण संचालक म्हणून केलेली नियुक्ती, कार्यकाळ पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांकडून गोपनीय अहवालाचे सादरीकरण आदी मुद्द्यांवर या अधिसभेत चर्चा होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
10 MAR 2022 लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. जयसिंगराव पवार, प्रा. एस. आर. यादव यांना डॉक्टरेट

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचा १० वा दीक्षांत समारंभ शनिवारी येथे होणार असून ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना डी.लिट. तर ज्येष्ठ वैज्ञानिक प्रा. एस. आर. यादव यांना डी.एस्सी. उपाधीने सन्मानित केले जाणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख पाहुणे आहेत, अशी माहिती कुलपती डॉ. संजय डी. पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, विद्यापीठाला सलग दुसऱ्यांदा नॅकचे अ मानांकन प्राप्त



जयसिंगराव पवार



एस.आर. यादव

झाले. उत्कृष्ट तांत्रिकता पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. विद्यापीठाकडून पीएच.डी. प्राप्त केलेले बहुसंख्य विद्यार्थी देश-विदेशात संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. परिक्षेत्रातील गरीब रुग्णांना मोफत सेवा दिली जात आहे. आंतरशाखीय वैद्यकीय विषयात पदव्युत्तर व संशोधन अभ्यासक्रम व अल्पकालीन पॅरामेडिकल अभ्यासक्रमही सुरू आहेत.

डॉ. जयसिंगराव पवार हे इतिहास संशोधक, इतिहासकार व समाजप्रबोधक आहेत. अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे ते संस्थापक अध्यक्ष असून महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीचे संस्थापक संचालक आहेत. डॉ. एस. आर. यादव यांच्या सन्मानार्थ ९ प्रजातींना त्यांचे नाव देण्यात आले आहे. पश्चिम घाटातील जैव प्रणाली व धोक्यात आलेल्या जातीचे संवर्धन करण्याचे काम त्यांनी हाती घेतले आहे. ३६१ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली जाणार आहे. ९ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदकाने तर डॉ. धनाजी बी. माळवेकर यांना विशेष संशोधक म्हणून सन्मानित केले जाणार आहे.

लोकसत्ता

# कोल्हापुरात चित्रपटनिर्मिती अभ्यासक्रम सुरू होणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात चित्रपटनिर्मिती अभ्यासक्रम येत्या जूनपासून सुरू होणार आहे, अशी माहिती अधिसभा सदस्य विशाल गायकवाड आणि सांगलीचे कलातरंग सांस्कृतिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष, कार्यकारी निर्माता विशाल कुलकर्णी यांनी बुधवारी येथे पत्रकार परिषदेत दिली. ते म्हणाले, सांगली, काल्हापूर, सातारा या भागात चित्रपटाचे अनेक चांगले कलाकार, तंत्रज्ञ उल्लेखनीय काम करत आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. त्यांना पुणे, मुंबईशिवाय दुसरा मार्ग नाही. या अडचणी लक्षात घेऊनच चित्रपटाचे माहेरघर संबोधल्या जाणाऱ्या कोल्हापुरात हा अभ्यासक्रम सुरू करण्याची मागणी केली होती. त्याला कुलगुरू डॉ. शिर्के यांनी मान्यता दिली असल्याने ग्रामीण भागातील कलाकारांना चांगली संधी मिळणार आहे. एफटीआय, सत्यजित रे अकादमी, अनेक नामांकित संस्थांच्या अभ्यासक्रमाचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. संहिता ते पडदापर्यंतच्या सर्व प्रक्रियांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

10 MAR 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ब्लड कॅन्सरवर आयुर्वेदिक उपचार; शिवाजी विद्यापीठाच्या बॉटनी विभागाला ऑस्ट्रेलियन पेटंट

## अमेरिकन पेटंटसाठीही अर्ज; डॉ. गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील टीमचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

रक्ताच्या कर्करोगावरील (ब्लड कॅन्सर) उपचारासाठी शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागातील संशोधन गटाला ऑस्ट्रेलियन पेटंट मिळाले आहे. आयुर्वेदिक औषधनिर्मितीसाठी ऑस्ट्रेलियन सरकारकडून 'सिंथेसिस ऑफ ब्लड कॅन्सर सेल ग्रोथ इनहीबीटर' या विषयावरील औषधनिर्मितीसाठी हे पेटंट मंजूर करण्यात आले आहे. कोल्हापूरच्या संशोधन क्षेत्रात मानाचा तुरा खोवणाऱ्या या औषधाला अमेरिकन पेटंट मिळावे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. डी. के. गायकवाड आणि संशोधक विद्यार्थी डॉ. चिराग नारायणकर, डॉ. निवास देसाई, डॉ. मानसी पाटील (स. गा. म. कॉलेज, कराड), डॉ. सागर देशमुख (न्यू कॉलेज, कोल्हापूर), पान ४ वर

### विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा

रक्ताचा कर्करोग हा जीवघेणा आजार आहे. जगात लाखो नागरिकांचा यामुळे मृत्यू होतो. यावर औषध तयार करण्यासाठी जगभरातील संशोधक अहोरात्र झटत आहेत. मात्र, शिवाजी विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र विभागाला रक्ताच्या कर्करोगावरील आयुर्वेदिक औषधाच्या निर्मितीसाठी ऑस्ट्रेलियन पेटंट मिळाले आहे. यापूर्वीही या विभागाला स्तनाच्या कर्करोगावरील उपचारासाठी भारत सरकारने दोन पेटंट मंजूर केले आहेत.

## ब्लड कॅन्सरवर आयुर्वेदिक उपचार; शिवाजी विद्यापीठाच्या बॉटनी विभागाला ऑस्ट्रेलियन पेटंट

(पान १ वरून)
डॉ. प्रतिष्ठा पवार (दा. पा. कॉलेज, कर्जत) व डॉ. उमेश पवार (पं. खे. कॉलेज, सावंतवाडी)


प्रा. डॉ. गायकवाड


डॉ. देसाई


डॉ. नारायणकर

यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे यासाठी मार्गदर्शन लाभले.

**रक्ताच्या कर्करोगावर निवडुंगाच्या अर्काचा पर्याय देण्याचा प्रयत्न**

या औषधामध्ये निवडुंग वनस्पतीचा अर्क वापरला आहे. यातील जीवाणूरोधक गुणधर्म रक्ताच्या कर्करोगाच्या पेशींची मात्रा कमी करण्यासाठी प्रभावी ठरू शकतात. रक्ताच्या कर्करोगाच्या उपचारावर चांगला पर्याय देण्याचा हा प्रयत्न असल्याचे डॉ. डी. के. गायकवाड यांनी सांगितले.

पुढारी

# संशोधन-शाश्वत प्रगती यातूनच समाज विकास

## प्रतिमा किर्लोस्कर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

यशस्वी उद्योजक होण्याकरिता संशोधन वृत्ती जोपासून आपल्या सभोवतालच्या समस्या ओळखून त्यावर प्रभावी कल्पनापूर्ण उत्तरे शोधली पाहिजेत, असे प्रतिपादन किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड (केबीएल) पुणे इनोवेशन (सोसायटी)च्या अध्यक्षा श्रीमती प्रतिमा किर्लोस्कर यांनी केले.

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात आयोजित स्टार्टअप सूत्र या ऑनलाईन व्याख्यानमालेमध्ये त्यांचे 'इनोव्हेशन व उद्योजकता याकरिता महिलांचे सबलीकरण' या विषयावर त्या बोलत होत्या. किर्लोस्कर उद्योग समूहाच्या ऑल लेडीज प्लांट विषयी माहिती देताना प्रतिमा किर्लोस्कर म्हणाल्या, उद्योगक्षेत्रात महिलांना विविध संधी उपलब्ध असून त्याकरता काम करण्याची आपली तयारी असली पाहिजे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, समस्या शोध ही इनोव्हेशनकरिता अतिशय महत्त्वाची आहे. याकरिता विविध घटकांशी संवाद साधणे गरजेचे आहेत. योग्य मानसिकता व योग्य दृष्टिकोन असेल तर नवसंशोधनासाठी सहकार्य नक्कीच मिळते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक प्रा. पी. डी. राऊत यांनी केले. सूत्रसंचालन हर्षवर्धन पंडित यांनी केले.

1 0 MAR 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवसंशोधकांनी घटनेच्या मूळ स्त्रोतापर्यंत पोहोचावे : डॉ. जज्ज

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

'नवसंशोधकांनी घटनेच्या मूळ स्त्रोतापर्यंत पोहोचले पाहिजे तर खऱ्या अर्थाने संशोधन पूर्णत्वास जाईल.' असे प्रतिपादन इंडियन सोशालॉजिकल सोसायटीचे माजी अध्यक्ष आणि गुरुनानकदेव विद्यापीठ अमृतसर येथील प्राध्यापक परमजित सिंग जज्ज यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने नवसंशोधकांसाठी 'धोरण संशोधन' विषयावर पाच दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात झाले. यावेळी स्वागत व प्रास्ताविक प्रा. जगन कराडे यांनी केले.

तरुणांमधील प्रतिभा ओळखणे, संशोधन आणि नवकल्पना संस्कृतीला चालना देणे, क्षमता निर्माण करणे, भारताच्या विकसनशील अर्थव्यवस्थेसाठी आणि राष्ट्रीय विकासासाठी ट्रान्स-डिसिप्लिनरी संशोधनाला चालना देणे आहे आणि मानवी विकास आणि मानववंश शास्त्रावर विशेष लक्ष केंद्रीत करून बहुसंस्थात्मक नेटवर्क आणि प्रभावी संशोधन प्रकल्पांना निधी देणे. हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे जज्ज यांनी सांगितले.

10 MAR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'डी. वाय.' विद्यापीठाचा शनिवारी दीक्षांत समारंभ


## प्रा. एस. आर. यादव, डॉ. जयसिंगराव पवार यांना डॉक्टरेट : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख अतिथी

**कसबा बावडा : प्रतिनिधी**

डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचा १० वा दीक्षांत समारंभ शनिवार, दि. १२ रोजी कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणाार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, दीक्षांत भाषण करणार आहेत. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना डी.लिट., तर प्रा. एस. आर. यादव यांना सन्माननीय डी.एस्सी. पदवीने सन्मानित केले जाणार आहे.


कुलगुरू शिर्के


डॉ. जयसिंगराव पवार


प्रा. एस. आर. यादव

हॉटेल सयाजी येथील व्हिक्टोरिया सभागृहात सकाळी ११ दीक्षांत समारंभ होणार असल्याची माहिती कुलपती डॉ. संजय डी. पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. शिम्पा शर्मा, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले, डीन राकेश कुमार शर्मा, परीक्षा नियंत्रक डॉ. ए. एन. जाधव, सल्लागार प्रा. अरुण पोवार, उपकुलसचिव संजय जाधव आदी उपस्थित होते.

डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाने शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विद्यापीठाकडून पीएच.डी. प्राप्त केलेले बहुसंख्य विद्यार्थी देश-विदेशात संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. दहाव्या दीक्षांत समारंभात एकूण ३६१ विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर पदवी प्रदान केली जाणार आहे. यावेळी ९ विद्यार्थ्यांना सुवर्णपदकाने गौरवण्यात येणार असून, डॉ. धनाजी माळवेकर यांना एक्सलन्स इन रिसर्च म्हणून सन्मानित केले जाणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

या पत्रकार परिषदेला कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. शिंपा शर्मा, अधिष्ठाता डॉ. राकेश शर्मा, रिसर्च डायरेक्टर डॉ. सी. डी. लोखंडे उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले यांनी स्वागत केले. परीक्षा नियंत्रक अजितसिंह जाधव यांनी दिल्या जाणाऱ्या पदव्यांची माहिती दिली.

10 MAR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रक्ताच्या कर्करोगावरील उपचारासाठी आयुर्वेदिक औषधाची निर्मिती


## शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्रज्ञांच्या टीमला ऑस्ट्रेलियन सरकारकडून औषध निर्मितीचे पेटंट मंजूर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील वनस्पतीशास्त्रज्ञांच्या चमूला रक्ताच्या कर्करोगावरील उपचारासाठी आयुर्वेदिक औषध निर्मितीसाठी ऑस्ट्रेलियन सरकारकडून औषधनिर्मिती पेटंट मंजूर झाले आहे. विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील वरिष्ठ प्रा. डॉ. डी. के. गायकवाड आणि त्यांचे संशोधक विद्यार्थी डॉ. चिराग नारायणकर, डॉ. निवास देसाई, डॉ. मानसी पाटील (स. गा. म. कॉलेज कराड), डॉ. सागर देशमुख (न्यू कॉलेज, कोल्हापूर), डॉ. प्रतिष्ठा पवार (दा. पा. कॉलेज, कर्जत) व डॉ. उमेश पवार (पं. खे. कॉलेज, सावंतवाडी) यांना ऑस्ट्रेलिया सरकारकडून 'सिंथेसिस ऑफ ब्लड कॅन्सर सेल ग्रोथ इनहिबिटर' या विषयावरील औषधनिर्मितीमध्ये पेटंट मंजूर झाले आहे.


डॉ. डी. के. गायकवाड


डॉ. निवास देसाई


डॉ. चिराग नारायणकर

रक्ताचा कर्करोग घातक आजार असून, यामुळे जगभरात लाखो लोक मृत्युमुखी पडतात. या भीषण रोगाला प्रतिरोध करणाऱ्या औषधनिर्मितीसाठी जगभरातील संशोधक प्रयत्न करत आहेत. या संशोधनाचा एक भाग म्हणून शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा. डी. के. गायकवाड आणि त्यांच्या संशोधक विद्यार्थ्यांनी रक्ताच्या कर्करोगावरील आयुर्वेदिक औषधाची निर्मिती केली आहे. या संदर्भात माहिती देताना डॉ. डी. के. गायकवाड म्हणाले, या औषधामध्ये निवडुंग प्रजातीच्या वनस्पतीचा अर्क वापरला आहे. या औषधातील जीवाणूरोधक गुणधर्मामुळे रक्ताच्या कर्करोगाच्या पेशींची मात्रा कमी करण्यासाठी ते प्रभावी ठरू शकते. या आयुर्वेदिक औषधाच्या मदतीने रक्ताच्या कर्करोगाच्या उपचारावर चांगला पर्याय देण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

या संपूर्ण टीमला स्तनाच्या कर्करोगावरील उपचारासाठी भारत सरकारकडून दोन पेटंट मंजूर झाले आहेत. या टीमने कर्करोगावरील संशोधनासाठी अमेरिकेकडेही पेटंटसाठी प्रस्ताव पाठवला आहे. या चमूला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात जूनपासून चित्रपट निर्मिती अभ्यासक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागामध्ये येत्या जूनपासून लवकरच चित्रपट निर्मितीचा सहा महिन्यांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू होणार असून, किमान १२ वी पास असलेल्या विद्यार्थ्यांना याचा लाभ घेंता येणार आहे. हा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी गेले दोन वर्षे पाठपुरावा केला असून, विद्यापीठाच्या अधिसभेमध्येही याचा ठराव मांडला होता. आता आमच्या पाठपुराव्याला यश आले आहे, अशी माहिती अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी 'कलातरंग' सांगलीचे विशाल कुलकर्णी उपस्थित होते. गायकवाड म्हणाले, चित्रपट निर्मितीचे माहेरघर असलेल्या कोल्हापुरात निर्मितीबाबतचा अभ्यासक्रम सुरू करावा, या मागणीसाठी २०२१ मध्ये कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्याकडे मामणी केली होती. लवकरच हा अभ्यासक्रम सुरू होणार असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. याचा फायदा कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यातील स्थानिक तरुणांना होणार आहे. कुलकर्णी म्हणाले, हा अभ्यासक्रम कसा असावा यासाठी आम्ही विद्यापीठाशी खूपदा चर्चा केली. त्यानुसार आता पूरक अभ्यासक्रम बनवला जाणार आहे. यामध्ये रेकॉर्डिंग, स्टुडिओ डबिंग, व्हिडीओ एडीटिंग, फिल्म ॲप्रीसिएशन या अभ्यासक्रमाचा समावेश आहे. यासाठी मराठी विभागाचे डॉ. रणधीर शिंदे मेहनत घेत असून, कुलगुरू डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू पी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

सकाळ

# ‘धोरण संशोधन’वर विद्यापीठात कार्यशाळा



कोल्हापूर, ता. ९ : ‘‘संशोधकांनी घटनेच्या मूळ स्रोतापर्यंत पोहोचले पाहिजे तर खऱ्या अर्थाने संशोधन पूर्णत्वास जाईल,’’ असे गुरुनानकदेव विद्यापीठ अमृतसर येथील प्रा. परमजित सिंग जज्ज यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे नवसंशोधकांसाठी ‘धोरण संशोधन’ विषयावर पाचदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन प्र-कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. प्रा. जगन कराडे यांनी स्वागत केले.

कार्यशाळेस विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ‘ट्रांस- डिसिप्लिनरी रिसर्च फॉर इंडियाज डेव्हलपिंग इकॉनमी’ योजनेंतर्गत अनुदान प्राप्त झाले. कार्यशाळेत ‘धोरण संशोधन विश्लेषण आणि मूल्यमापन, धोरण संशोधन पद्धती, शोधनिबंध लेखन, गुणात्मक व संख्यात्मक संशोधन पद्धती, धोरण संशोधनातील संख्याशास्त्र, धोरण संशोधन प्रबंध लेखन आदींवर मार्गदर्शन करण्यात येईल.

प्रा., डॉ. व्ही. बी. ककडे, बालाजी केंद्रे, पी. एस. कांबळे, प्रतिमा पवार, एम. एस. देशमुख, विद्यानंद खंडागळे, सोमनाथ पवार, श्रीकृष्ण महाजन, सतीश शर्मा, प्रा. कराडे मार्गदर्शन करणार आहेत. समाजशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात आयोजन केले असून निवडक २५ सहभागी नवसंशोधकांचा सहभाग आहे.

10 MAR 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात चित्रपटनिर्मिती अभ्यासक्रम

## सहा महिन्यांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम जूनपासून: श्रीनिवास गायकवाड यांची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागामध्ये जून २०२२ पासून चित्रपटनिर्मितीचा सहा महिन्यांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू होणार आहे. या अभ्यासक्रमाला बारावी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी गेले दोन वर्षे पाठपुरावा केला असून, विद्यापीठाच्या अधिसभेमध्येही याचा ठराव मांडला होता. या पाठपुराव्याला यश आले आहे, अशी माहिती अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड यांनी प्रेस क्लबमधील आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



गायकवाड म्हणाले, चित्रपटनिर्मितीचे माहेरघर असलेल्या कोल्हापुरात चित्रपट निर्मितीबाबतचा अभ्यासक्रम सुरू करावा, या मागणीसाठी २०२१ मध्ये कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्याकडे मागणी केली होती. जूनमध्ये हा अभ्यासक्रम सुरू होणार असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. याचा फायदा विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील तरुणांना होणार आहे. हा अभ्यासक्रम कसा असावा यासाठी आम्ही विद्यापीठाशी खूपदा चर्चा केली. त्यानुसार आता पूरक अभ्यासक्रम बनवला जाणार आहे. यामध्ये रेकॉर्डिंग, स्टुडिओ डबिंग, व्हिडिओ एडिटिंग, फिल्म ॲप्रीसिएशन या अभ्यासक्रमाचा समावेश आहे. यासाठी मराठी विभागाचे डॉ. रणधीर शिंदे मेहनत घेत असून, कुलगुरू डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू पी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे. यावेळी कलातरंग विशाल कुलकर्णी उपस्थित होते.

- **परिक्षेत्रातील तरुणांच्या कलागुणांना मिळणार वाव**

Times of India

# SUK to start course in film-making

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University Kolhapur (SUK) will start a film-making certificate programme from June —a long-pending demand.

Also, a degree programme in film-making will also start in the next few years. SU senate member Srinivas Gaikwad along with founder president and executive producer of Sangli's Kalatarang Sanskritik Pratishthan Vishal Kulkarni had approached the SU vice-chancellor Dr. T Shirke in 2020 demanding a post-graduate course in film-making and constantly followed up the issue for around 18 months.

"Actors, directors and technicians from Western Maharashtra are doing a remarkable work, but still there are no educational institutes in Sangli, Satara and Kolhapur districts for those interested in pursuing a career in film-making," Gaikwad said.